# प्रेसनोट

दिनांक २९/०५/२०२०




नागपूर शहर पोलीस आयुक्तालय तर्फे **कोविड १९ या** महामारी साठी घ्यावयाची दक्षता आणि सोशल डिस्टसिंग बाबत ''**नागपूर पोलीस डिजीटल शार्ट फिल्म फेस्टिवल**'' आयोजित करण्यात आलेली होती.

''कम्युनिटी पोलीसींग'' अंतर्गत प्रतिबंधक उपाय योजना राबविण्याकरिता पोलीस आणि जनतेच्या मध्ये योग्य समन्वय स्थापित व्हावा, कोरोना विषाणु पासून बचाव करणेकरिता सोशल डिस्टसिंग किती आवश्यक आहे हा संदेश जनतेपर्यंत पोहचून त्यांचे मनात प्रतिबिंबीत व्हावा या साठी एक नविन उपक्रमाचे माध्यमातून अवेयरनेस करण्यात येणार आहे.

सध्या मोबाईल आणि सोशल मिडीया चे माध्यमाने लोकांमध्ये जनजागृती करणे सोईचे झालेले आहे. **डोळयाने पाहीलेल्या गोष्टी सहजासहजी विसरता येत नाही किंवा लवकर लक्षात येतात** म्हणून लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी सर्वात उत्तम माध्यम म्हणजे व्हिडीओग्राफी असे म्हणता येईल. हीच संकल्पना लक्षात ठेवून अवेयरनेस व्हिडीओ **(शॉर्टफिल्म)** तयार करून सर्व जनतेपर्यंत पोहचवून लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचे उद्देशाने तसेच तरूण कलाकारांना चांगल्या गोष्टीसाठी त्यांची प्रतिभा वापरून त्यांचे कलेचे प्रदर्शन आणि लोकांमध्ये जनजागृती करण्याची संधी **नागपूर पोलीस डिजीटल शार्ट फिल्म फेस्टिवल** या उपक्रमातून उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यासाठी पहीले प्रसारित न केलेले व नव्याने तयार केलेले शॉर्टफिल्म व्हिडीओ तयार करून २२ मे २०२० पर्यंत **ngppolicesf@gmail.com** वर नोंदणी फॉर्म सह मागविण्यात आलेले होते. सदर प्रतियोगितेमध्ये जनतेने उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला असून एकुण ९९ शॉर्ट फिल्म बाबत ई मेल मिळालेले असून ज्या शॉर्टफिल्म रजिस्ट्रेशन फॉर्मसह सादर करण्यात आल्या अशा एकुण ८८ शॉर्ट फिल्म प्रतियोगितेमध्ये सहभागी करण्यात आलेल्या असून सर्व शॉर्टफिल्मचे तज्ञांचे मदतीने अवलोकन करण्यात आले असून त्यापैकी उत्तम अशा २४ शॉर्टफिल्मची

निवड करून पुरस्कारासाठी नॉमिनेट करण्यात आलेल्या होत्या. ज्यांचे शॉर्टफिल्म ला नॉमिनेट करण्यात आलेले आहे त्यांना ई मेल द्वारे कळविण्यात आलेले आहे.

## नॉमिनेट करण्यात आलेल्या शार्टफिल्म खालील प्रमाणे

| Sr No | Name | Subject Concept (Short Film Name) |
|---|---|---|
| 1 | Ambarish Shripad Kolte | Social Distancing |
| 2 | Aniruddha Ram Nimkhedkar | Preventive Measures for Corona Virus |
| 3 | Ankush Sharma | LOCK_UP_DOWN |
| 4 | Dhiraj Meshram | Swa Raksha Se Sarva Raksha |
| 5 | Faiz Khan | India Fights Corona |
| 6 | Kaushik Pendam | Please respect social distance |
| 7 | Kinjal Vivek Shelkar | Corona Se mat Darona |
| 8 | Nikhil Sanjay Bombatkar | Birds in COVID-19 |
| 9 | Prathmesh Sanjay Deshkar | Gharon Me Raho |
| 10 | Chiranjeev Sishil Singh | Social Distancing CORONA kes Sath bhi CORONA ke baad bhi |
| 11 | Kulmeet singh Gujral | Social Distance Frenzy |
| 12 | Ajay Rajkarne | Social Distancing |
| 13 | Nikhil Pimpalgaonkar | Majburi |
| 14 | Rohit Budgujar | SUPER DISTANCE |
| 15 | Abhishek Singh | Samajdari isi me |
| 16 | Aniesh Rajinder Rana | Twenty20 |
| 17 | Avinash Dinesh Nikash | **थोड़ीसी सावधानी**, **होगी** No **परेशानी** Animation movie |
| 18 | Avinash Dinesh Nikash | DISTANT |
| 19 | Harshad Rameshwar Kadve | Do gaj ka Fasla |
| 20 | SANKET GALACTUS | "OPTION" |
| 21 | SHRUSHTI DHOKE | FAR TOO CLOSE |
| 22 | Shubham Suryawanshi | Faisla (Every Dicision Matter) |
| 23 | Anand Motiram Kasambe | Samajik Antarachi Kimaya |
| 24 | Karan Pandharinath Penore | keep social distance to save your life |

वरील यादीप्रमाणे शॉर्ट फिल्म नॉमिनेट करण्यात आलेल्या असून त्यापैकी प्रथम, द्वितीय पुरस्कारासाठी प्रत्येकी एक शॉर्ट फिल्म आणि तृतीय पुरस्कारासाठी २ शॉर्ट फिल्मची निवड करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे ॲनिमेशन कॅटेगरी मध्ये समाविष्ट असलेली १ शॉर्ट फिल्म ची बक्षिसासाठी निवड करण्यात आलेली आहे.

## पुरस्कार प्राप्त शॉर्ट फिल्म खालीलप्रमाणे

| Sr No | Name | Short Film Name | Prize |
|---|---|---|---|
| 1 | Shrushti Dhoke | Far Too Close | **1st Prize** |
| 2 | Faiz Khan | India Fights Corona | **2nd Prize** |
| 3 | Ajay Rajkarne | Social Distancing | **3rd Prize** |
| 4 | Karan Pandharinath Penore | Keep Social Distance To Save Your Life | **3rd Prize (Encouragement )** |
| 5 | Avinash Dinesh Nikash | थोड़ीसी सावधानी, होगी No परेशानी | **Animation Category** |

नागपूर शहर डिजीटल शार्ट फिल्म फेस्टिवल मध्ये भाग घेणा—या सर्वांना, ज्यांची शॉर्ट फिल्म नॉमिनेट झाली त्यांना आणि विजेत्यांना डिजीटल प्रमाणपत्र ई मेलद्वारे देण्यात येणार आहे. नॉमिनेट झालेल्या सर्व शॉर्ट फिल्म नागपूर

शहर पोलीस लोगो आणि टॅगलाईन सह नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाचे फेसबुक आणि व्टिट्र अकाउंट वरून प्रसारित करण्यात येणार आहे.

नागपूर शहर शॉर्ट फिल्म फेस्टिवल हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर डॉ. भूषण कुमार उपाध्याय, मा. सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर श्री रविन्द्र कदम यांचे नेतृत्वाखाली डॉ. निलेश भरणे, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्री गजानन शिवलिंग राजमाने, पोलीस उपायुक्त(डिटेक्शन) यांचे मार्गदर्शनात पोनि श्री भानुदास पिदूरकर, पोउपनि श्री राजकुमार त्रिपाठी, पोउपनि श्री बलराम झाडोकर, पोहवा श्री रोमहर्ष काळमेघ, पोशि बादल मांढरे, पोशि सहदेव चिखले यांनी उत्स्फुर्तपणे नियोजनपुर्वक कामकाज पाहीले.

त्याचप्रमाणे शॉर्टफिल्म फेस्टिवल यशस्वी करण्याकरिता **तज्ञ** म्हणून **श्री रविन्द्र दुरूगकर ( अभिनेता/निर्देशक) , श्री मिलींद रमेश कुळकर्णी (अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ विदर्भाचे समन्वयक/निर्देशक )** यांची मोलाची मदत नागपूर शहर पोलीसांना लाभलेली आहे.